श्री राम चंद्र मिशन®
India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY



# ऐतिहासिक विशेष एक दिवसीय भंडारा

## दि. १५ ऑगस्ट २०१२, मणपाक्कम, चेन्नई

दि. ११ ऑगस्ट रोजी गुरुदेवांनी बंधू कमलेश पटेल यांना मिशनच्या कार्यकारी मंडळाची विशेष सभा दि. १५ रोजी बाबूजी मेमोरियल आश्रम, मणपाक्कम येथे आयोजित करावी असा आदेश दिला. लगेचच संध्याकाळी गुरुदेवांनी आश्रमाच्या व्यवस्थापकांना बोलावले व विशेष असा एक दिवसीय भंडारा आयोजित करण्याच्या आपल्या निर्णयाची माहिती त्यांना त्याच दिवशी दिली. या भंडाऱ्याचे आमंत्रण सहज संदेशद्वारे सर्व अभ्यासींना देण्यासाठीचे पत्रदेखिल त्यांनी लिहून घेतले. ही अभ्यासींची विशेष सर्वसाधारण सभा असणार होती. सकाळी ६.३० व ११ वाजता तसेच सायंकाळी ४.३० वाजता सत्संगांचे आयोजन करण्यात आले होते.


दि. ५ जुलै पासून गुरुदेवांना प्रकृतिवरील उपचारादरम्यान अत्यंत प्रतिकूलतेचा सामना करावा लागला होता. नेहमीप्रमाणे, कोणालाही न सांगता, तक्रार न करता, आतडी व मूत्रमार्गाचा संसर्ग त्यांनी सहन केला. मिशनच्या अभ्यासींकरीता सुद्धा हा चिंतेने ग्रासलेला काळ होता. नेहमीच्या अन्नप्राशनाला आडकाठी असल्याने गुरुदेवांचे वजन घटले होते. त्यांच्या आयुष्यात प्रथमच, इतक्या मोठ्या काळाकरीता त्यांना अंथरुणावर पडून रहावे लागले होते. त्यामुळे गुरुदेवांच्या 'विशेष भंडाऱ्याच्या' आदेशाने जगभरातील अभ्यासींना आश्चर्य वाटले. गुरुदेवांच्या हृदयापासून निघालेल्या सादेला सुमारे एकवीस हजार अभ्यासींनी दोन दिवसात मणपाक्कम येथे येऊन प्रतिसाद दिला!



"तुमचा प्रतिसाद, तुमचा प्रचंड असा प्रतिसाद पाहून माझे प्रिय बाबूजी महाराज 'व्हिस्पर्स' मध्ये जे पुन्हा पुन्हा सांगतात ते खरे आहे याबद्दल माझी खात्री पटली आहे– सत्य जाणून घेण्याकरीता हृदये खुली होत आहेत, लोकांना आध्यात्मिक जीवनाची अधिकाधिक गरज भासत आहे, ते बांधिलकीकरीता राजी होत असून स्वत:ला (या कार्याकरीता) समर्पित करण्यासाठी तयार होत आहेत. हे अतिशय उत्तम लक्षण आहे."

दि. १५ ऑगस्ट २०१२
मणपाक्कम, चेन्नई





दि. ११ ऑगस्ट रोजी, म्हणजेच आदल्या दिवशी गुरुदेवांच्या पीईटी/सीटी स्कॅन तपासणीचा निकाल उत्तम आला. त्यामध्ये कुठेही स्थानिक संसर्ग नसल्याचे निष्पन्न झाले. ही चांगली बातमी होती. या परिणामामुळे सगळे डॉक्टर्स आनंदित झाले. "जर तपासण्यांमध्ये मला कुठलेही आजार नसल्याचे निष्पन्न झाले आहे, तर हे डॉक्टर्स मला औषधे का देत आहेत?" असे गुरुदेवांनी चेष्टेच्या सुरात विचारताच कक्षातील प्रत्येकालाच मनापासून हसू आले.


भंडाऱ्याबद्दलचे परिपत्रक वितरीत केल्यानंतर, त्यासाठी केवळ तीन दिवसाचा अवधी असल्याने पूर्व-तयारीची प्रचंड प्रमाणावर सुरुवात करण्यात आली. बेंगलोर येथील विश्वसनीय अशा श्री. फ्रान्सिस यांना त्यांच्या सामान-सुमान व चमूसहित पाचारण करण्यात आले. तिरुपूर येथील आपल्या भंडाऱ्याकरीता पायाभूत सुविधा उभारण्याचा त्यांना प्रगाढ अनुभव आहे. तिरुपूर येथील स्वयंसेवकांनीही हे आव्हान पेलले व अपेक्षित असणाऱ्या १० ते १५ हजार अभ्यासींकरीता सुविधा उपलब्ध करण्यात ते पूढील दिवस गढून गेले. संपूर्ण आश्रमभर तंबू व शामियाने उभारण्यात आले. निवासाकरीता व ध्यानाकरीता आश्रमातील सपाट व खुल्या जागांमध्ये तंबू तयार केले गेले. चार तंबूंनी व्यापलेली २५००० चौ. फूट जागा ध्यान-कक्षाच्या दोन्ही बाजूंना तयार करण्यात आली. राहण्याकरीता ३०००० चौ. फूट क्षेत्रफळाचे शामियाने बनविण्यात आले.

निवास-स्थानांची व्यवस्था हे एक मोठे आव्हान होते. आश्रमाच्या जवळपास राहणाऱ्या अभ्यासींनी आपली घरे येणाऱ्या अभ्यासींकरीता उपलब्ध करून दिली होती. एकत्र राहण्याच्या व परस्परांकरीता त्याग करण्याच्या या प्रक्रियेतून खऱ्या बंधुत्वाच्या भावनेचा प्रत्यय येत होता. आश्रम व अभ्यासींच्या घरांबरोबरच ओमेगा शाळेतही सुमारे १५०० अभ्यासींच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. जवळच्या एका चर्चच्या प्रांगणातील सुसज्ज अशा 'कल्याण-मंडपा'मध्ये अजून ९०० अभ्यासी रहात होते. अशा प्रकारे निवास-स्थानांची व्यवस्था सुलभतेने करण्यात आली.

या मंगल प्रसंगी आश्रमाला सुशोभित करावे या गुरुदेवांच्या इच्छेनुसार दि. १४ ऑगस्टच्या रात्री ध्यान-कक्ष, गुरुदेवांचे कुटीर, बाबूजी मंडप, रुचि कॅफे, आश्रमाचे प्रवेशद्वार इत्यादि ठिकाणी रोषणाई व आरास करण्यात येत होती. आश्रमाचे सर्वच भाग फुले, दिवे व इतर साधनांनी सुशोभित करण्यात आले होते. आश्रम सुशोभीत केलेला असून अत्यंत तेजस्वी, स्वच्छ व अभ्यासींनी संपूर्ण भरलेला आहे ही बातमी गुरुदेवांपर्यंत पोहोचली. व्हील-चेअरमध्ये बसून आश्रमामध्ये फेरी मारण्याच्या गुरुदेवांच्या निर्णयामुळे सर्वांना सुखद आश्चर्याचा धक्का बसला. सुरुवातीला त्यांनी आपल्या कुटीराच्या व्हरांड्यामध्ये जाण्याची इच्छा डॉक्टरांकडे व्यक्त केली. बाबूजी मंडप येथील रोषणाई व सजावट पाहून त्यांनी तेथे घेऊन जाण्यास सांगीतले. तेथून परत येत असताना आपला हात उंचावून त्यांनी कुटीराच्या मुख्य प्रवेशद्वाराकडे निर्देश केला. त्यानंतर ते सुशोभित केलेला ध्यानकक्ष पाहण्याकरीता रवाना झाले.















नविनच तयार केलेल्या उतरणीवरुन पू. गुरुदेवांनी ध्यानकक्षामध्ये प्रवेश केला व ध्यानकक्षाची पाहणी करण्यासाठी ते व्यासपीठावर गेले. त्यावेळेस रात्रीचे ८ वाजले होते व तेथे काम करणाऱ्या सगळ्या अभ्यासींना गुरुदेवांना तेथे बघून आश्चर्याचा धक्काच बसला. संपूर्ण ध्यानकक्ष फुलांच्या सजावटीने व छतापासून ते रोमन पद्धतीच्या खांबांवर सर्वत्र सोडलेल्या पडद्यांनी सुशोभीत केला होता. गुरुदेव आपल्या कुटीरामध्ये परत येत असताना त्यांचा उजळलेला चेहरा सर्वांच्याच लक्षात आला.

हजारोंच्या संख्येने अभ्यासी आश्रमामध्ये येण्यास सुरुवात झाली होती. आश्रमामध्ये कुठेही मोकळी जागा नव्हती. सर्वत्र अभ्यासीच दिसत होते. यादिवशी पूर्ण रात्र झोपलेले क्वचितच कोणी असेल. यावेळी एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येत होती की या अशा परिस्थितीमध्ये देखिल कुठेही गडबड गोंधळ किंवा अव्यवस्था दिसून येत नव्हती आणि शिस्तबद्धता व निस्तब्धता जाणवत होती. सगळीकडे सर्वजण एकमेकांना मदतीचा हात देतांना दिसत होते. सकाळी ६:३० वाजताचा सत्संग बंधू कमलेश पटेल यांनी संचालित केला. तो सुमारे तासभर चालला. सत्संग संपल्यानंतर जेव्हा अभ्यासी ध्यानगृहातून बाहेर येत होते, ते दृष्य खरोखरीच बघण्यासारखे होते. सर्वत्र शांतता व स्वयंशिस्त दिसून येत होती व एकही अभ्यासी त्या लयीचा भंग करताना दिसून येत नव्हता. तसेच पू. गुरुदेवांना बघण्यासाठी कोणीही गुरुदेवांच्या कुटिराकडे जाण्याचा प्रयत्न करीत नव्हते.

पू. गुरुदेव सकाळी ९.३० वा. ध्यानगृहामध्ये येणार असल्याची घोषणा करण्यात आली व सर्व अभ्यासींना ध्यानगृहामध्ये पुन्हा एकत्र येण्याची विनंती करण्यात आली. निश्चितच सर्वजण ज्या क्षणाची आतूरतेने वाट बघत होते तो हा क्षण होता. सुमारे १०.३० वा. पू. गुरुदेव चाकाच्या खुर्चीतून ध्यानगृहामध्ये प्रवेश करते झाले. त्यांना श्वसनाचा त्रास होऊ नये म्हणून सोबत ऑक्सिजनचे सिलेंडरदेखिल (नळकांडेदेखिल) होते. नुकत्याच आलेल्या आजारपणामुळे त्यांच्या प्रकृतीवर चांगलाच परिणाम झालेला जाणवत होता. ते खूपच अशक्त झालेले दिसत होते. त्यांच्या प्रत्येक हालचालीमुळे तसेच बोललेल्या प्रत्येक शब्दामुळे त्यांच्या शरीरावर येणारा ताण स्पष्टपणे लक्षात येत होता. उपस्थित असलेले बहूतेक अभ्यासी गुरुदेवांना त्यांच्या दीर्घ आजारपणाच्या काळानंतर बघत होते व त्यांना आपल्या समोर उपस्थित बघून आनंदित झाले होते. गुरुदेव त्यांच्या तत्कालीन आजाराबद्दल व त्याचा त्यांच्यावर कसा परिणाम झाला आहे याबद्दल बोलले. ते म्हणाले की त्यांची मिशनच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची व त्याजागी बंधू कमलेश पटेल यांची नियुक्ती करण्याची इच्छा आहे. त्यांनी कार्यकारी मंडळाची यास मान्यता आहे का ते विचारले परंतु त्यांनी दुसरा पर्याय सुचवत अध्यक्षपदी गुरुदेवांनी कायम रहावे व बंधू कमलेश पटेल यांना उपाध्यक्षपदी नेमावे असा प्रस्ताव मांडला. गुरुदेवांनी ज्यावेळी उपस्थित समुदायाला यासंबंधी विचारले तेव्हा सगळ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात याचे समर्थन केले. गुरुदेव म्हणाले की उपाध्यक्षांकडे अध्यक्षांच्या सर्व जबाबदाऱ्या, कर्तव्ये व अधिकार असतील व ते पू. गुरुदेवांच्या थेट देखरेखीखाली व मार्गदर्शनानुसार काम करतील. यानंतर गुरुदेवांनी एक छोटीशी १५ मिनीटांची सिटींग दिली व ते परत आपल्या कुटीराकडे गेले.संध्याकाळच्या सत्संगाचे संचालन बंधू कमलेश पटेल यांनी केले. तत्पूर्वी मिशनच्या सचिवांनी व सहसचिवांनी सकाळच्या घटनेबाबत










स्पष्टीकरण दिले आणि बंधू कमलेश पटेल यांची मिशनचे उपाध्यक्ष म्हणून नियुक्ति झाल्याचे नोंदविणारा व कार्यकारी मंडळाने पारित केलेला ठराव उपस्थित समुदायापुढे वाचून दाखविला. सत्संगानंतर बंधू कमलेश पटेल यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यात त्यांनी दोन महत्वाचे मुद्दे मांडले. प्रथम म्हणजे मिशनचे काम करण्यासाठी अथवा मिशनमध्ये सेवा करण्यासाठी एखाद्यास कोणत्याही पदाची किंवा उपाधीची आवश्यकता नसते व दुसरा म्हणजे 'ऐक्य व सुसंवाद' ही आज काळाची गरज कशी आहे, आणि सर्व बंधू भगिनींनी कोणत्याही परिस्थितीत व कोणतेही मूल्य देऊन ह्या गोष्टी कायमस्वरूपी पाळल्या पाहिजेत. एकवीस हजार अभ्यासी या भंडाऱ्यास उपस्थित आहेत हे जेव्हा गुरुदेवांना सांगितले गेले तेव्हा ते किती आनंदित झाले हे बंधू कमलेश यांनी अभ्यासींना सांगितले. “केवळ दोन दिवसांच्या पूर्वसूचनेवर एवढे लोक आले आहेत..... ही माझी माणसे आहेत!” गुरुदेव उद्गारले. संध्याकाळचा सत्संग झाल्यावर अभ्यासी परतण्यास सुरुवात झाली. आश्रमाबाहेरील प्रमुख रस्त्यावरील वाहतुकीचे व्यवस्थापन करणे हे एक आव्हानच होते. गुरुदेवांनी आपला राजीनामा देण्याचा मूळ इरादा सोडून दिला व मिशनच्या कामकाजाच्या सर्वोच्च स्थानी या पुढेही राहण्याचे कृपाळूपणे मान्य केले, या मुळे श्रद्धाळू भक्तांची मन:स्थिती काळजीतून सुटका झाल्यासारखी होती. परंतु त्याच वेळी प्रशासकीय कामाचे अवजड ओझे नियुक्त व तरूण उत्तराधिकाऱ्याच्या खांद्यांवर सोपवून, आपले काम हलके करून गुरुदेव एक महत्वाचे पाऊल उचलत होते.

“स्मरण हे प्रियकराला प्रेमिकेच्या समीप आणते. या समीपतेला मर्यादा नसते. प्रेम व आकर्षण जितके अधिक तितके आपण 'त्या'च्या निकट पोहोचतो. हा नाते संबंध आपणास वारसा हक्काने प्राप्त होतो. 'त्या'ची जास्तीतजास्त जवळीक मिळविण्यासाठी हे नाते विकसित कसे करावयाचे हे आता आपल्यावर अवलंबून असते”



बाबूजी महाराजांच्या 'कंप्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र, खण्ड -१' पृष्ठ २०७ मधून उधृत.

## गुरुदेवांसंबंधी अहवाल

### गुरुवार, दि. २१ जून २०१२

गुरुदेव गायत्री येथे असताना त्यांचा जन्मदिवस तिरुपूर येथे साजरा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ही एक अत्यंत आनंदाची बातमी होती. गुरुदेवांना बाबूजी महाराजांकडून जुलै २०११ मध्ये दोन संदेश मिळाले होते. त्यामध्ये अशा समारंभाच्या निमित्ताने सर्वांनी एकत्र जमण्याचे महत्व तसेच असे समारंभ प्रत्येक वर्षी भरविले जावेत यावर विशेष भर दिला होता. जेव्हा गुरुदेवांनी हे संदेश वाचले तेव्हा त्यांनी जन्मदिवस समारंभ तिरुप्पूर येथे आयोजित करण्याचे ठरविले. अभ्यासींनी खूप कष्टाने मिळविलेली कमाई समारंभ स्थानापर्यंत प्रवास करण्यावर त्यांना खर्चावी लागेल याची गुरुदेवांना काळजी वाटत होती. त्यामुळे त्यांनी निर्देशित केले की या समारंभासाठी कोणत्याही प्रकारचे देणगीमूल्य ठरविण्यात येऊ नये व ते पूर्णत: ऐच्छिक असावे.

### शुक्रवार, दि. २२ जून २०१२

गुरुदेव आश्रमात आले व त्यांनी विशाखापट्टणम व आंध्र प्रदेशातील इतर केंद्रांतून आलेल्या अभ्यासींना भेटण्यासाठी निवासकक्ष 'A' ला भेट दिली. हा खूप मोठा समूह होता व त्यामुळे निवासकक्ष संपूर्ण भरला होता. गुरुदेवांना भेटण्याची प्रत्येकालाच तीव्र इच्छा होती. गुरुदेवांनी एका सत्संगाचे संचालन केले व नंतर एक भाषण दिले. ते 'मूढ भक्ति' (अंधश्रद्धा) या विषयावर बोलले. ही खरोखर एक समस्या असून या सापळ्यात कोणी अडकू नये असे त्यांनी प्रतिपादन केले. त्या ऐवजी प्रत्येकाने सांगितल्याप्रमाणे व योग्य रीतीने साधना करावी व सहज मार्ग पद्धतीचे फायदे अनुभवावेत. खरी अध्यात्मिक प्रगती करून घेण्यासाठी जुन्या पूजा पद्धति व चाली-रीतींचा त्याग केला पाहिजे असेही ते पुढे म्हणाले. त्यानंतर, मोठ्या संख्येने जमलेल्या लोकांमधून गुरुदेव शांतपणे आपल्या कुटीराकडे गेले.

गुरुदेवांनी दुपारी एका वयस्कर भगिनीसाठी एक चाकांची खुर्ची खरेदी करविण्याची व्यवस्था केली व आश्रमात ती भगिनी जेथे थांबली होती





तेथे संध्याकाळी जाऊन गुरुदेवांनी ती चाकाची खुर्ची त्या भगिनीस भेट दिली.ओळखीच्या वृद्ध भगिनीप्रति गुरुदेवांना वाटणारी काळजी व जिव्हाळा याची जाणीव करून देणारा हा एक सुंदर क्षण होता. यानंतर गुरुदेव गोल्फ–कार्टमधून फेरी मारत असताना अनेक अभ्यासींना भेटले. ते उपाहार–गृहाच्या बाहेर थांबले होते तेव्हा तेथून काही खाद्यपदार्थ मागविण्यात आले. ते त्यांनी खाल्ले व त्यांच्या आजूबाजूच्या लोकांना वाटले. कुटीरामध्ये परत आल्यावर त्यांनी त्यांचे काम सुरू केले.

## शनिवार, २३ जून, २०१२

तिरुपूर येथून आलेल्या १५–२० अभ्यासींनी सकाळी गुरुदेवांची भेट घेतली. त्यांच्यापैकी काही जणांशी गुरुदेवांनी आपल्या शयनकक्षामध्ये चर्चा केली. नंतर आलेल्या सर्वांची भेट घेऊन न्याहारीनंतर सर्वांना पुन्हा भेटणार असल्याचे सांगितले व उपस्थितांना प्रसाद दिला. न्याहारीनंतर गुरुदेव दिवाणखान्यात आले व सर्वजण त्यांच्या सभोवती बसले. "मला प्रश्न विचारा" असे त्यांनी उपस्थितांना सांगितले. तिरुपूर येथे होणाऱ्या आगामी समारंभाविषयी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व शंकांचे निरसन करताना त्यांनी पुन्हा प्रश्न विचारण्याची विनंती केली.

एका अभ्यासीने गुरुदेवांना सांगितले, "जेव्हा काम करायचे असते तेव्हा मी उत्तेजित होतो व माझ्या मनाची शांतता ढळते" यावर गुरुदेव उत्तरले की जेव्हा निर्णय घेण्याची वेळ येते, तेव्हा तुम्ही एक पाऊल मागे जावे, दीर्घ श्वसन करावे किंवा आकाशामध्ये पाहून ठरवावे. काही काळ थांबायला तुम्ही शिकले पाहिजे. दीर्घ श्वसन कसे करावे हे गुरुदेवांनी वर बघत स्वत: करुन दाखविले. "काम हे मोहात पाडणारे असू शकते त्यामुळे आपण सावध राहिले पाहिजे" असे ते पुढे म्हणाले.

## रविवार, २४ जून, २०१२

बंधू कमलेश यांना गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगादरम्यान त्यांच्या शेजारी बसण्यास सांगितले. हा सत्संग सुमारे एक तासाचा होता. त्यानंतर बंधू कमलेश यांची प्रकृति बिघडली. सुमारे एक आठवडा ते जंतु–संसर्गाने आजारी होते.

## २५–२९ जून, २०१२

आठवड्याचा बराचसा काळ गुरुदेवाच्या प्रकृतीमध्ये चढ–उतार चालू होते. त्यांनी पुष्कळ विश्रांती घेतली व अभ्यासींच्या भेटी–गाठी रहित केल्या.

शुक्रवारी रात्री जेवणानंतर गुरुदेव शोभा गुर्टू यांनी गायलेले 'म्हारो प्रणाम'हे गीत ऐकत होते. या गाण्यामुळे मंत्रमुग्ध होऊन, अत्यंत लक्षपूर्वक ते श्रवणाचा आनंद घेत होते. स्तब्ध राहून गाणे ऐकण्याचा हा अनुभव सर्वांकरीताच अद्वितीय असा होता.

## रविवार, १ जुलै, २०१२

सकाळच्या सत्संगाचे संचालन करण्यासाठी गुरुदेव लवकर तयार झाले. सत्संग व न्याहारीनंतर त्यांनी बंधू आदित्य व त्यांची आई भगिनी सुजाता यांच्याबरोबर दीर्घ चर्चा केली. आदित्य हे गुरुदेवांच्या भावाचे नातू आहेत. कुटुंबातील एका लग्नसमारंभासाठी ते भारतात आले असून गुरुदेवांची भेट घेण्यासाठी आले होते. गुरुदेव आदित्यकडे विषेश लक्ष पुरविताना दिसत होते.

सकाळच्या सत्संगाबद्दल गुरुदेव उपस्थितांशी चर्चा करत होते. हा सत्संग १ तास ५ मिनिटाचा होता असे सांगणाऱ्या अभ्यासीची चूक तो सत्संग १ तास ७ मिनिटाचा होता असे सांगून गुरुदेवांनी सुधारली. गुरुदेव पुढे म्हणाले की हा सत्संग खास असा होता. एखाद्या आकाशगंगेतील कृष्ण–विवरात ओढले जात असल्याची अनुभूती त्यांना यावेळी जाणवली.

या वार्तालापानंतर गुरुदेवांनी होसूर येथील अभ्यासींची भेट घेतली व अभ्यासी वसाहतीबाबतच्या जमिनीच्या कागद–पत्रांचे वाटप केले. सुमारे ६० अभ्यासी यावेळी उपस्थित होते. यावेळी गुरुदेव थकलेले दिसत होते. ते आराम करण्यासाठी गेले व सायंकाळी ७ वाजता जागे झाले. तयार झाल्यानंतर ते कोलकात्याहून नुकत्याच आलेल्या अभ्यासींच्या मोठ्या समुदायाला भेटले. ही भेट त्यांच्या शयन–कक्षामध्ये संपूर्ण शांततेमध्ये झाली. कोणीही बोलत नव्हते आणि त्या शांत साहचर्यात (कम्युनियन) गुरुदेवांच्या सर्वांवर असलेल्या प्रेमाची अनुभूती प्रत्येकजण घेऊ शकत होता.

गुरुदेवांनी आश्रमाच्या बांधकामासंबंधीत असलेले सादरीकरण टेलीविजनवर पाहिले, त्यांनी कार्यालयातच रात्रीचे भोजन घेतले व



त्यानंतर एका अभ्यासीच्या नृत्याचे (अरंगेत्रमचे) प्रत्यक्ष प्रसारण टेलीविजनवर पाहिले.

मंगळवार दि. ३ जुलै रोजी गुरुपौर्णिमा होती. अनेक जण या मंगल दिवशी गुरुदेवांचे आशीर्वाद घेण्यासाठी सकाळी ६ वाजताच कुटीरामध्ये आले होते. गुरुदेवांनी शांतपणे सर्वांची भेट घेतली व त्यांना आशीर्वाद दिले. ते म्हणाले, “जेव्हा मी माझ्या गुरुदेवांकडे गेलो, तेव्हा मला गुरुपौर्णिमेविषयी काहीही माहीत नव्हते. मी चाळीस वर्षांचा होतो आणि बाबूजी म्हणाले, तुमची वाढ चाळीस पट वेगाने होवो. मी सुध्दा तुम्हा सर्वांना तसाच आशीर्वाद देतो.”

सकाळच्या तासाभराच्या सत्संगानंतर गुरुदेवांनी नऊ विवाह संपन्न केले. त्यानंतर काही भजने ऐकली आणि मग ते त्यांच्या कुटीरामध्ये गेले. त्या दिवशी फारच दबाव होता, प्रत्येकजण गुरुदेवांना भेटू इच्छित होता. पण गुरुदेव थकले असल्याने ते विश्रांती घेण्यास गेले.

### रविवार, दि. ८ जुलै, २०१२

या सप्ताहात बहुतेक वेळा गुरुदेवांच्या प्रकृतीत चढउतार होत होता. ते दि. ९ रोजी गायत्री येथे गेले व सप्ताहाच्या अखेरीस आश्रमात परतण्याचा त्यांचा बेत होता.

गुरुदेव गायत्री मधे अतिशय चांगल्या मन:स्थितीत होते पण त्यांची प्रकृती कधी चांगली असायची तर कधी बिघडायची. असे रोजच होत होते. त्यांच्या प्रकृतीत अचानक होणारे हे बदल पाहणे अत्यंत दु:खदायक होते. आदल्या रात्री त्यांना बरे वाटत नव्हते म्हणून ते लवकर झोपी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते इतक्या आनंदी मन:स्थितीत होते की विश्वास बसणार नाही. त्यांनी तिरुपुरच्या उत्सव समितीस तेथील कामाच्या प्रगतीसंबंधी एक संदेश पाठवला. गुरुदेव म्हणाले, “तेथील काम वेगाने होत आहे यात आश्चर्यजनक काहीच नाही. जेव्हा काम प्रेमाने केले जाते, तेव्हा निसर्ग पूर्ण सहकार्य करतो. मला नेहमी आईची आठवण येते, जी आपल्या बाळाला नऊ महिने सांभाळते, सर्व पीडा व शारिरीक वेदना सहन करते, जे अजून जन्मालाही आले नाही, जे अजून भविष्यात आहे, त्या आपल्या बाळाच्या सोनेरी आशांच्या पाठबळावर, केवळ तिच्या प्रेमाच्या पाठबळावर. मी प्रार्थना करतो की अशा प्रेमाचा आशीर्वाद आपल्या सर्व अभ्यासींना लाभू दे.” गुरुदेवांनी नंतर ही आईची कल्पना तपशीलवार मांडली, तिला त्यांनी नाव दिले “जीवनवृक्ष” त्यांनी एका झाडाचे चित्र रेखाटले व तो संदेश चित्ररुपाने सुध्दा दर्शवला.

गुरुदेव रविवार दि. १४ जुलै रोजी आश्रमात परतले. त्यांची प्रकृती ठीक नव्हती. दि. १५ रोजी त्यांची प्रकृती फारच खालावली व त्यामुळे त्यांना त्यांच्या जन्मदिवसाच्या समारंभासाठी तिरुपुरला जाण्याचा बेत रद्द करावा लागला.

गुरुदेव दि. १६ जुलै रोजी नवीन मिडिया दालनाचे उदघाटन करणार होते पण त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे, बंधू कमलेश यांनी त्याचे उदघाटन केले. मिडिया दालन सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त आहे व त्यात अनेक छोटी दालने आहेत. आय टी सर्व्हर एरिया आहे आणि जेथे ध्वनीमुद्रण केले जाऊ शकते असे एक १०० % ध्वनी प्रतिकारक्षम (साऊंड प्रुफ) दालन ही आहे.

गुरुदेवांचे आजारपण जवळ जवळ तीन आठवड्यापासून सुरू असले तरी आता त्यांची प्रकृती हळूहळू सुधारत आहे. पाहुण्यांसाठी आश्रम जुलै महिन्याच्या अखेरीपर्यंत बंद ठेवण्यात आला होता. अनेक अभ्यासी तिरुपुरच्या समारंभानंतर मणपाक्कमला भेट देणार होते त्यांना पर्यायी व्यवस्था करण्याचे सांगण्यात आले होते. गुरुदेवांची देखभाल करणारे डॉक्टर्स मधून मधून गुरुदेवांच्या प्रकृतीची, तसेच त्यांच्यात हळूहळू होत असलेल्या सुधारणेची माहिती सर्व अभ्यासींना देत होते. आम्ही सर्व अभ्यासी बंधू भगिनींना विनंती करतो की त्यांनी आपल्या प्रिय गुरुदेवांची प्रकृती लवकरात लवकर सुधारण्यासाठी व त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करीत रहावे.







# नविन प्रकाशने

तिरुपूर येथे गुरुदेवांच्या ८६व्या जन्मदिनाचा मंगल प्रसंग साजरा होत असताना वीस पुस्तके आणि आठ ध्वनी–चित्रफीतींचे प्रकाशन करण्यात आले. काच, कॅनव्हास आणि रुपेरी कोरीव काम केलेल्या खास छायाचित्रांचा संच या वेळी प्रकाशित करण्यात आला. या छायाचित्रांसाठी नोंदणी खुली आहे आणि पूर्वसूचना देऊन ते उपलब्ध आहेत. इच्छूक अभ्यासींनी July24.photos@gmail.com वर संपर्क साधावा. विविध स्तरांवरील आणि विविध किमतीची शेकडो छायाचित्रेसुद्धा छायाचित्रदालनात उपलब्ध होती.

## ध्वनी आणि चित्रफीतींचे प्रकाशन

व्हिस्पर्स
फ्रेंच एम.पी. ३





ते ,हुक्का आणि मी
इंग्रजी–




सहजमार्ग मिंडरींग्ज
इंग्रजी– डी.व्ही.डी.




प्रशिक्षकांसाठी गुरुदेवांची भाषणे
खंड १ आणि २– इंग्रजी एम.पी. ३




गुरुदेवांची चेन्नई आणि कोइमतुर
येथील भाषणे




दि इटर्नल पॉवर ऑफ लव
खंड १ इंग्रजी– डी.व्ही.डी.




मास्टर्स चॉईस खंड ४ एम.पी. ३





इनर रिफ्लेक्शन्स खंड २ एम.पी. ३





## नविन पुस्तके

ते, हुक्का आणि मी
इंग्रजी





दहा सूक्तांवरील भाष्य





अभ्यासी दैनंदिनी




प्रशिक्षक निर्देशिका





कॉमिक बुक–तिमोठी





मेसेजेस युनिव्हर्सल २
(तामिळ, तेलगू,मराठी, गुजराथी, कन्नडा, मल्याळम)



सहजमार्गाची तत्वे खंड १५




द परस्युट ऑफ दि इनरवे



# गुरुदेवांच्या ८६व्या जन्मदिवसाचे समारंभ

आसाम – दिब्रुगढमधील अभ्यासींनी गुरुदेवांचा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. एका मुलाने 'हॅपी बर्थ डे' हे गाणे वाजविले तर एका भगिनीने भजने प्रस्तुत केली. गुरुदेवांच्या भाषणाच्या दोन DVD दाखविल्यावर अल्पोपहार व प्रसादाच्या सेवनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

अलाहाबाद– सत्संग झाल्यानंतर मुलांनी केलेले नृत्य, भगिनींनी गायलेली भजने, युवक वर्गाने सादर केलेले गुरुदेवांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे गाणे हे समारंभातील मुख्य कार्यक्रम होते. सुमारे ६०० अभ्यासी गुरुदेवांना शुभेच्छा देणारे गाणे म्हणण्यात सहभागी झाले होते. ध्यान–गृहाच्या सभोवती कडूनिंबाची रोपे लाऊन अभ्यासींनी वृक्षारोपण केले. भगिनी निशा आणि तिच्या सहकाऱ्यांनी एका परस्पर–संवादी चर्चासत्राचे आयोजन केले होते. संध्याकाळच्या सत्संगानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

लखनऊ– तीन दिवसीय कार्यक्रमात २०० अभ्यासी सामील झाले होते. दि. २३ जुलै रोजी सकाळच्या सत्संगानंतर काही अभ्यासींची विचार प्रवर्तक भाषणे व अनुभव कथन झाले. दि.२४ जुलै रोजी मुसळधार पाऊस असूनही ३०० अभ्यासी आश्रमात पोहचले. सकाळच्या सत्संगानंतर झालेले मुलांचे कार्यक्रम अभ्यासींच्या हृदयाला स्पर्श करणारे होते. यावेळी प्रस्तुत केलेल्या संवादपूर्ण नाटकाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

पंजाब व हरियाणा – पंजाब व हरियाणातील अभ्यासींनी गुरुदेवांचा वाढदिवस आपापल्या केंद्रांमध्ये साजरा केला. सोनीपत येथे तीन दिवसीय समारंभ आयोजित केला होता. सुमारे शंभर अभ्यासींनी त्यात भाग घेतला. सत्संगानंतर गुरुदेवांच्या व लालाजी महाराजांच्या जीवनावरील DVD दाखविण्यात आल्या. पटियालामध्ये मुलांसाठी चित्रकला व सुलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच तीनही दिवशी तीन सत्संग संचालित करण्यात आले. चंडीगढ मध्ये ५५ अभ्यासींनी आपला सहभाग नोंदविला. संध्याकाळी गुरुदेवांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याचे ऐकून अभ्यासींना आनंद झाला.

कोलकाता आश्रम दि.२३ ते २५ जुलैच्या कार्यक्रमासाठी कोलकाता केंद्रातील ३०० अभ्यासी तर झारखण्ड, बंदेल, शांतीपूर इत्यादि उपकेंद्रांतील ५० अभ्यासी उपस्थित होते. दि.२४ जुलै रोजी रवीन्द्रसंगीत, भजने गुरुदेवांच्या प्रवासांबद्दल DVD, वरिष्ठांचे अनुभव कथन, साधना पद्धतीचे आणि भंडाऱ्यास उपस्थित राहण्याचे महत्व या विषयावरील भाषणे झाली. यानंतर सहज मार्ग पद्धती वरील परस्पर चर्चेचे सत्र झाले. भोजनानंतर पुन्हा गुरुदेवांच्या हिंदी व इंग्रजीतील भाषणांच्या DVD दाखविण्यात आल्या. गुरुदेवांच्या 'डाऊन मेमरी लेन' या आत्मकथनावरील एका सादरीकरणामुळे सर्व अभ्यासींना प्रिय गुरुदेवांच्या स्मरणामध्ये रममाण होण्यास सहाय्य झाले.

## राजस्थान

जयपूर : तीनही दिवशी सकाळी ७.३०वा. व संध्याकाळी ५.००वा. सत्संगाचे संचालन करण्यात आले. सुमारे २८० अभ्यासी व ६५ मुलांची उपस्थिती या कार्यक्रमास होती. दि. २४ रोजी मुलांनी एक गाणे सादर केले व सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला. सहज मार्गाच्या विविध पैलूंवर बंधू तरुण, भगिनी अंजली व बंधू अनिल यांनी भाषणे केली. दि. २५ तारखेच्या सत्संगानंतर भगिनी रमा कोचर यांनी बाबूजी महाराजांच्या स्तुति पर एक भक्ति गीत गायले.

उदयपूर : सकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांच्या चरित्राचे वाचन करण्यात आले. तसेच सहज मार्ग साधना पद्धतीच्या सामर्थ्याविषयी चर्चा सत्र घेण्यात आले. भगिनींनी गायलेल्या भजनांनंतर गट चर्चा करण्यात आली. मुलांनी विविध कवितांचे पठण केले. सर्व अभ्यासी त्या नंतर आध्यात्मिक आशयाचा एक खेळ खेळले व 'निवडा व बोला' या साठी वेगवेगळे विषय देण्यात आले.

जोधपूर :२७५ अभ्यासी तीन दिवसीय समारंभास उपस्थित होते. अभ्यासींनी भजने गायीली व स्वयंसेवा केली. 'आध्यात्मिकतेतील सर्व आजारांवर साधना हेच औषध आहे' या विषयी चर्चा झाली. सहजमार्गात प्रवेश केल्यावर आलेल्या अनुभवांचे अभ्यासींनी आदान प्रदान केले. प्रत्येकाने गुरुदेवांच्या स्वास्थ्यासाठी प्रार्थना केली.

अजमेर : सकाळी ७.३०वा. ४८ अभ्यासी सत्संगासाठी जमले होते. गुरुदेवांच्या भाषणांच्या DVD, 'व्हिस्पर्स' मधील विशेष संदेशांचे वाचन, गुरुदेवांच्या भाषणातील उताऱ्यांचे वाचन यांचा कार्यक्रमात समावेश होता. अभ्यासी व मुलांनी म्हटलेली भजने तसेच गुरुदेवांच्या जीवनावरील शब्दकोड्यांची स्पर्धा यामुळे त्या दिवसाच्या कार्यक्रमास रंगत आली. भंडाऱ्यास उपस्थित राहण्याचे महत्व या विषयावर बंधू पी. के. अरोरा यांनी भाषण केले. ११ वाजताच्या सत्संगानंतर गुरुदेवांचा व्हिडिओ दाखविण्यात आला. संध्याकाळचा सत्संग बंधू पी. के. अरोरा यांच्या निवासस्थानी पार पडला.

अलवार : अलवार तसेच राजगढ, खैरताल, कोटपुतली, बांदीकुई, महवा, पीलवा वगैरे जवळपासच्या केंद्रांतील सुमारे १६० अभ्यासी 'योगाश्रम', अलवार येथे दि. २३ ते २५ जुलै च्या समारंभात सहभागी झाले होते. नि:स्वार्थ प्रेम व सेवा या सारख्या चारित्र्य गुणांचा दाखला देणाऱ्या गुरुदेवांच्या जीवनाचे अभ्यासींनी स्मरण केले.

श्री गंगानगर : बंधू पी. के. मिधा यांच्या निवास स्थानी सुमारे १३० अभ्यासी व ३० मुले उपस्थित होती. सकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांच्या जीवनावरील पुस्तकांचे वाचन करण्यात आले. एक कविता म्हणण्यात आली. व 'गुरु पौर्णिमा' या विषयावरील एक DVD दाखविण्यात आली. संध्याकाळी मुलांनी गाणी व कविता सादर केल्या.

भिलवाडा : सकाळी ७.३० च्या सत्संगानंतर गुरुदेवांच्या आवडीची भजने सादर करण्यात आली. अभ्यासी व त्यांच्या मुलांनी भजने व कविता सादर केल्या. 'सत्योदय' या पुस्तकातील उताऱ्यांचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी 'इन्सान बनो' ही VCD दाखविण्यात आली. सकाळच्या ध्यानास ५० तर संध्याकाळी २१ अभ्यासी उपस्थित होते

# प्रसार करतांना....



## शिक्षकांना प्रोत्साहित करतांना, काशीपुर, उत्तराखंड

पूर्ण दिवसीय कार्यक्रमात अभ्यासींना तीन गटात विभागण्यात आले आणि त्यांना सामान्यत: नव्या अभिलाषीं(मुमूक्षू)द्वारे विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी करण्यास सांगितले गेले. त्यानंतर दोन अभ्यासी आमने–सामने बसले आणि आभासी सत्र झाले. चर्चेदरम्यान पुष्कळ शंका उत्पन्न झाल्या, सरावाची मूलतत्त्वे आणि (नव्याने अभ्यासी होणाऱ्या लोकांना) मुमूक्षूंना काय सांगायचे याची माहिती होणे किती महत्त्वाचे आहे याची सर्वांना जाणीव झाली.

यानंतर दि. ७ ऑगस्ट रोजी एका शाळा चालवणाऱ्या बंधुंनी शिक्षकांच्या एका गटाला प्रोत्साहित केले आणि एका छोट्या संमेलनाचे आयोजन केले. शिक्षकांना सहज मार्गाबद्दल संक्षिप्त कल्पना व माहिती–पत्रके देण्यात आली होती. मानवी जीवनाचे वास्तविक ध्येय आणि छोटी वैयक्तिक ध्येये या बद्दलचे समज आणि यातील फरक, तसेच धर्मातून अध्यात्माकडे पुढे कसे जावे हे स्पष्ट करण्यात आले. या कार्यक्रमाचा शेवट साधना कशी करावी हे समजून घेण्याने झाला. हे कथन सर्वांना समजले आणि बऱ्याच शिक्षकांनी ह्या संकल्पना पूर्वी कधीच न ऐकल्याचे सांगितले.

मोठ्या खुल्या सत्रांपेक्षा छोट्या, छोट्या समूहांमध्ये या संदर्भात मुक्त संवाद अतिशय सोपा होतो, हे निदर्शनास आले. सुमारे १५ शिक्षक उपस्थित असणाऱ्या, दीड तास चाललेल्या या सत्राचा शेवट प्रश्नोत्तरांच्या सत्राने झाला.

## विद्यार्थी आणि युवावर्ग, कोलकाता

दि. १२ ऑगस्ट रोजी कोलकोता आश्रमात हेरिटेज इंस्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीमधून आलेल्या नव्या मुमूक्षूंच्या उत्साही समूहाकरीता खुल्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. स्वागतपर भाषणानंतर कोलकाता केंद्राचे प्रमुख बंधू मिसाल मित्तल यांनी 'सहजमार्गाची मूलतत्वे' या विषयावर अत्यंत व्यापक असे सादरीकरण प्रस्तुत केले. माणूस आपले 'बुडबुड्यापमाणे असणारे क्षणभंगुर असे सामाजिक व आर्थिक जीवन' हेच वास्तविक जीवन आहे असे गृहीत धरून चालतो या चर्चेने सुरुवात करत त्यांनी त्यामुळे तो निर्सगाच्या निर्मिती पासून दूर जातो हे सांगितले. योगा आणि ध्यानापासून सर्व संकल्पना त्यांनी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केल्या.

ह्यानंतर चार तरूण अभ्यासी अभियंत्यांना भाषण करण्यासाठी पाचारण करण्यात आले, त्यावेळी त्यांनी मिशनमध्ये सहभागी होण्यामागची कारणे आणि त्यांना आतापर्यंत आलेले अनुभव सांगितले. कार्यक्रमाची सांगता प्रश्नोत्तरांच्या सत्राने झाली. उपस्थित असलेल्या सुमारे ७० लोकांना सहजमार्गाची माहिती असणारे पत्रक



वितरीत करण्यात आले. यात ३० हेरिटेज इंस्टीट्यूटचे विद्यार्थी, काही मुमूक्षू आणि इतर अभ्यासी होते. त्यांच्याकडून होकारात्मक प्रतिसाद मिळाला व काहींनी सिटींग घेण्यामध्ये स्वारस्य दाखवले.

## पोलिस अधिकाऱ्यांना संबोधताना, मैसूर

दि. १६ ऑगस्ट २०१२ रोजी मिशनचे सहसचिव बंधू ए. पी. दुराई यांना, ३९ थेट नेमणूक झालेल्या सहाय्यक पोलीस अधिक्षकांना व १९ उपनिरीक्षकांना संबोधण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. यांचे मूळ प्रशिक्षण कर्नाटक पोलीस अकादमी, मैसूर, येथे चालू होते. श्री. अमर कुमार पान्डे, आय.पी.एस., पोलीस महानिरिक्षक आणि पोलीस अकादमीचे संचालक यांनी वक्त्यांची ओळख करून देताना ते कर्नाटकातील एक आदर्श पोलीस अधिकारी होते आणि १९९६–९७ मध्ये डिजीपी म्हणून काम करत असताना अनुकरणीय मानले जात होते हे उपस्थितांना सांगितले व त्यांच्या उल्लेखनीय अशा राज्यस्तरीय कामगिरीच्या सूचीचा उल्लेख केला.

बंधू ए. पी. दुराई यांनी 'पोलीसांसाठी चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर भाषण केले. या संदर्भात श्रोत्यांना संबोधित करताना त्यांनी गुरुदेवांच्या शिकवणुकीचा मोठ्या प्रमाणात वापर करत, आपल्या जीवनात कर्माचे कार्य कसे चालते यावर भर देऊन आपल्या विचार आणि कृतींमुळे होणाऱ्या परिणामांना आपणच कसे जबाबदार असतो, हे सांगितले. बंधू दुराई यांनी हे तत्त्व स्वत: पोलीस अधिकारी म्हणून काम करताना केलेल्या निरीक्षणातून आणि स्वानुभवातून सोदाहरण स्पष्ट केले. आपले कर्तव्य कोणाची भीती न बाळगता आणि कोणा एकाला प्राधान्य न देता, आपल्या अंर्तमनाची साद ऐकून करावे ह्या त्यांच्या प्रतिपादनाचा सर्वांच्या मनावर ठसा उमटला असे जाणवत होते.

येशु ख्रिस्ताची आणि भगवदगीतेतील वचने सर्व प्रशिक्षणार्थींना उत्तम प्रकारे समजली. त्यांना वक्त्यासमवेत संवाद साधण्यासाठी आणि त्यांचा दृष्टीकोन व शंका व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहीत केले गेले. हे सत्र सुमारे ९० मिनिटे चालले. गुरुदेवांच्या अस्तित्वाची व प्रोत्साहनाची अनुभूती सर्वांना जाणवत होती.

## तिरुपूर आश्रमात खुले सत्र

दि. १२ ऑगस्ट रोजी घेण्यात येणाऱ्या खुल्या सत्राबद्दल जारी करण्यात आलेल्या एका परिपत्रकानुसार चेट्टीपलायम योगाश्रम, तिरुपूर येथे आलेल्या सुमारे पंचाहत्तर निमंत्रितांचे स्वयंसेवकांच्या एका गटाने स्वागत केले. केंद्रप्रमुख बंधू रवि सुब्बियन यांनी अभ्यागतांचे स्वागत केले आणि साधना सुरु करण्यासाठी आवश्यक बाबींविषयी माहिती दिली. काही मोजक्या अभ्यासी स्वयंसेवकांनी कोणत्या परिस्थितीत त्यांची मिशनशी ओळख झाली तसेच साधनेमुळे त्यांना कसे फायदे झाले ह्या संबंधी आपले अनुभव कथन केले.

त्याच दिवशी निमंत्रितांपैकी ५० जणांनी त्यांचे पहिले सिटींग घेतले. सर्वांच्या सिटींग संपेपर्यंत दुपारचे ४ वाजले. निमंत्रितांचा इतका चांगला प्रतिसाद मिळणे हे केवळ गुरुदेवांच्या कृपेमुळेच शक्य झाले असे प्रत्येकास वाटत होते.

## युवा कार्यक्रम, म्हैसूर

दि. १२ ऑगस्ट रोजी संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने बेंगलोर आश्रमातील सुमारे ३० अभ्यासींनी आदल्या दिवशी संध्याकाळीच म्हैसूर आश्रम येथे कूच केले. प्रवासादरम्यान एकमेकांना जाणून घेण्याची त्यांना संधी मिळाली. भोजनाच्या वेळी नुकत्याच भेटलेल्या एका व्यक्तीची इतरांना ओळख करून द्यावी असे प्रत्येक अभ्यासीस सांगण्यात आले. त्या नंतर विश्वबंधूत्वाची प्रार्थना झाली व 'किंग्ज स्पीच' हा चित्रपट दाखविण्यात आला.

दुसरे दिवशी वैयक्तिक ध्यानानंतर आश्रमात दूरवर चालणे आणि क्रिकेट व इतर खेळांसाठी वेळ देण्यात आला होता. म्हैसूर केंद्रातील काही युवा अभ्यासीसुद्धा कार्यक्रमात सामील झाले. सकाळी ९.३० वा. सत्संग व न्याहारीनंतर एल.एम.ओ.आय.एस. च्या माजी विद्यार्थ्यांपुढे गुरुदेवांनी दिलेल्या भाषणाची **DVD** दाखवून सत्राची सुरुवात झाली. नंतर त्या भाषणावर आधारित एका चर्चासत्राचे सूत्र-संचालन भगिनी प्रिया हेगडे यांनी केले.

त्या नंतर सहभागी अभ्यासींचे दोन गट पाडण्यात आले आणि त्यांना एकेक बटाटा देऊन सांगण्यात आले की त्या बटाट्यास मित्र मानून बटाटारूपी मित्राची गटामधील इतर सदस्यांशी ओळख करून देण्याच्या उद्देशाने एखादी गोष्ट रचावी. यामुळे अभ्यासींच्या विचारक्षमतेस व निर्मितीक्षमतेस चालना मिळाली व त्यातून जीवनाच्या भौतिक व आध्यात्मिक पैलूंचे मिश्रण असलेल्या मजेशीर गोष्टी ऐकण्यास मिळाल्या. त्यापुढील छोट्याशा विश्रांतीनंतरच्या सत्रात 'निवडा व बोला' कार्यक्रम घेण्यात आला. त्यामध्ये प्रत्येक अभ्यासीला गुरुदेवांच्या दिलेल्या अवतरणांपैकी एक अवतरण निवडून त्यावर दोन मिनिटे बोलण्यास सांगण्यात आले. त्यानंतर पुन्हा अभ्यासींचे दोन गट पाडून भगिनी अनन्याने सामान्य ज्ञानावरील शब्दकोडे स्पर्धा घेतली.

एकंदरीत संपूर्ण कार्यक्रम हा छोटासाच पण नेमका व खूपच प्रभावी झाला. सर्वांना आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या बंधू-भगिनींना जाणून घेण्याची व एकमेकांचे विचार समजून घेण्याची संधी मिळाली.




## चित्रकला स्पर्धा, भीलवाडा, राजस्थान

उन्हाळाच्या सुटीमध्ये आठ ते सोळा वयोगटातील मुलांसाठी 'निसर्ग' या विषयावर एक चित्रकला स्पर्धा तर अठरा ते तीस वयोगटातील युवकांसाठी 'अपेक्षा' या विषयावर एक निबंधलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याचा निकाल दि. ८ जुलै रोजी जाहीर करण्यात आला. सर्व चित्रे ध्यानगृहामध्ये प्रदर्शित करण्यात आली. एका चित्राने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. त्यात त्या स्पर्धकाने एक मूल, एक खेडूत व एक शहरी व्यक्ति निसर्गाकडे कशा निरनिराळ्या दृष्टीने पाहतील, याचे चित्रण केले होते.

## युवा कार्यक्रम, कोलकाता, पश्चिम बंगाल

कोलकाता आश्रमात १८ ते ३५ वयोगटातील सुमारे शंभर अभ्यासी आहेत. तथापि त्यापैकी केवळ पंधरा ते वीस जणच नियमितपणे रविवारच्या सत्संगास उपस्थित असतात व आश्रमाच्या उपक्रमात भाग घेतात असे निदर्शनास आले होते. त्या सर्व अभ्यासींना एकत्र आणून, आश्रमाच्या उपक्रमांत सहभागी होण्याकरिता त्यांना प्रवृत्त करण्यासाठीच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून कृति-आराखडा तयार करण्यासाठी काही अभ्यासी एकत्र जमले.

युवा समूहाचा एक आधारभूत माहितीकोष तयार करणे, रविवारच्या सत्संगानंतर पुस्तक वाचन सत्राचे आयोजन करणे, क्रिकेट खेळासारखे मैदानी उपक्रम इत्यादि अनेक सूचना प्राप्त झाल्या. अभ्यासींना त्यांची नोंदणी करण्याकरिता प्रोत्साहित करण्यासाठी एक युवा कक्ष सलग तीन रविवारी स्थापन करण्यात आला.

तत्पश्चात जुलै २०१२ पासून प्रत्येक रविवारी एक अनौपचारिक असे दोन तासांचे एक विशेष सत्र आयोजित करण्यात येत आहे. विचारांचे आदान-प्रदान करणे, साधनेच्या महत्वाच्या पैलूंवर चर्चा करणे, अभ्यासींचे त्यांच्या मध्ये झालेल्या परिवर्तनासंबंधी अनुभव कथन, आत्मपरीक्षण व गुरुदेवांनी दिलेल्या भाषणांचे सामूहिक वाचन इत्यादींचा या सत्रामध्ये समावेश असतो. परिणाम स्वरूप अभ्यासींची उपस्थिति सावकाश पण निश्चितपणे वाढू लागली आहे.



# दिल्ली विभागीय आश्रम

## प्रकाशाचे केंद्र





दिल्ली येथील एक आश्रम शहराच्या मध्यवर्ती भागात आर.के पुरम येथे आहे व दुसरा दिल्ली–हरियाणा सीमेवर आहे. हा दुसरा, विभागीय आश्रम, गुरगाव आश्रम या नावाने प्रसिद्ध आहे. हा आंतरराष्ट्रीय विमानतळापासून १२ कि.मी व राष्ट्रांतर्गत (डोमेस्टीक) विमानतळापासून १५ कि.मी अंतरावर आहे.



६.५ एकरवर वसलेल्या या आश्रमाचे उदघाटन गुरुदेवांनी दि. १५ जून २००१ रोजी केले होते. ध्यानकक्षाची क्षमता सुमारे २००० अभ्यासींची आहे. सुरवातीला मणपाक्कम मधील जुन्या ध्यानकक्षाचे पोलादी खांबावर उभारलेले अस्बेस्टॉस पत्रे छतासाठी वापरण्यात आले होते, परंतु त्यानंतरच्या सुधारणा प्रक्रियेमध्ये अस्बेस्टॉस पत्र्यांऐवजी घडवलेल्या धातूचे पत्रे वापरण्यात आले तसेच मूळ कक्षाच्या दोन्ही बाजूस अतिरिक्त बांधकाम करुन ध्यानकक्ष मोठा करण्यात आला. उन्हाळ्यात जेव्हा येथे होरपळून काढणारी उष्णता असते त्यावेळी छत ओले करण्यासाठी पाण्याचा शिडकावा करण्याची सोय करण्यात आली आहे. याशिवाय छतासाठी उष्णतारोधकाचा वापर केल्याने ध्यानकक्षातील उष्णता बरीच कमी झाली आहे.



गुरुदेवांचे कार्यालय ध्यानकक्षाच्या एका बाजूला आहे. गुरुदेवांच्या भेटीदरम्यान ते जेथे बसतात ती हिरवळ येथून दिसते. दि. २० एप्रिल २००८ रोजी गुरुदेवांनी या इमारतीचे उदघाटन केले व दर्शनी भागात दोन छोटया रोपट्यांचे वृक्षारोपण केले. ज्यांच्यामुळे गुरगाव (गुरु+गाव) हे नाव प्रचलित झाले असे मानले जाते त्या द्रोणाचार्यांच्या पुतळ्याचे अनावरण सुद्धा त्यांनी केले.



आश्रमाच्या एका कोपऱ्यात मोठे स्वयंपाकघर आहे, त्याचा काही भाग उपाहारगृह म्हणून वापरला जातो. मोठ्या समारंभाच्यावेळी अतिरिक्त स्वछतागृहांची सोय करता येईल अशी तरतूद असलेले एक आधुनिक स्वछतागृह येथे उपलब्ध आहे. आश्रमाच्या परिसरात वाहने उभी करण्यासाठी पुरेशा जागेची तरतूद आहे. मुख्य प्रवेशद्वारांपैकी एका दाराजवळ पुस्तक–विक्री केंद्र व लहान मुलांचे केंद्र आहे. मुलांना बाहेर खेळण्यासाठी जागा आहे. आश्रमाची अर्ध्याहून अधिक जागा अनेक हंगामी भाजीपाल्याच्या सेंद्रीय शेतीसाठी वापरली जाते. चार माळी व एक रखवालदार त्यांच्या कुटुंबियांसोबत आश्रमातच राहतात. हे जवळपासच्या केंद्रांना मिशनची प्रकाशने वितरित करणारे केंद्र सुद्धा आहे. येथे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी संपूर्ण दिवसीय सत्संग आयोजित केला जातो.



दि.३१ मे २००९ रोजी या आश्रमातील सत्संगानंतर गुरुदेवांनी जगभरातील सत्संगाची वेळ बदलून सकाळी ७.३० अशी केली. गुरुदेवांनी मानवी अस्तित्वाच्या उद्देश्यावर भर दिला व ते म्हणाले, "मी तुम्हा सर्वांना पुन्हा एकदा याची जाणीव करुन देऊ इच्छितो की आपण जीवनात जे काही करतो–श्वासोच्छवास, खाणे व पिणे, काम करणे, आराम, झोप – प्रत्येक गोष्ट ही या नियमाशी मिळती जुळती असली पाहिजे की हे सर्व जगण्यासाठी आहे आणि जगणे असावे केवळ या एकाच उद्देश्यासाठी,की ज्यामुळे मी माझ्या मानवीय स्तरावरून ज्याला दिव्यत्व म्हटले जाते, त्यात उन्नत होईन".

**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.